<u>वितरण आदेश क्र.१४</u>

सन २०१७-१८

यशवंतराव चव्हाण विकास प्रशासन प्रबोधिनी, पुणे
या संस्थेस सहाय्यक अनुदान २०१७-२०१८ (अनिवार्य)
<u>जानेवारी २०१८ ते मार्च २०१८ (अंतिम हप्ता)</u>

महाराष्ट्र शासन
सामान्य प्रशासन विभाग
शासन निर्णय क्रमांकः यशदा २०१७ /प्र.क्र. ६८/१७/१२ अ
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक : २० मार्च, २०१८

<u>वाचा :</u> १. वित्त विभाग, शासन परिपत्रक क्र. अर्थसं २०१७ /प्र.क्र.६८/अर्थ- ३, दि.१ एप्रिल, २०१७.
२. सामान्य प्रशासन विभाग, शासन परिपत्रक क्र. - बीयुडी-२०१७/ प्र.क्र.७० /२०१७/२५, दि.५ एप्रिल, २०१७.
३. वित्त विभाग, शासन परिपत्रक क्र. अर्थसं २०१७ /प्र.क्र.७५/अर्थ - ३, दि.१८ एप्रिल, २०१७.
४. सामान्य प्रशासन विभाग, शासन परिपत्रक क्र. बीयुडी-२०१७/ प्र.क्र.७० /२०१७/२५, दि.२० एप्रिल, २०१७.
५. सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र.यशदा २०१७ /प्रक्र.६८/१७/ १२-अ, दि.२१ एप्रिल,२०१७.
६. वित्त विभाग, शासन परिपत्रक क्र. अर्थसं २०१७ /प्र.क्र. ९४/अर्थ- ३, दि. ३० जून, २०१७.
७. सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र.यशदा २०१७ /प्रक्र.६८/१७/ १२-अ, दि. १२ डिसेंबर,२०१७.
८. वित्त विभाग, शासन परिपत्रक क्र. अर्थसं २०१७ /प्र.क्र. ७५/अर्थ- ३, दि. ६ फेब्रुवारी, २०१८
९. लेखाअधिकारी, यशदा पुणे यांचे पत्र क्र.यशदा/लेखा/BUDGET & UC/न.क्र.८८/२०१८ दि.२६.२.२०१८.

शासन निर्णय :-

यशवंतराव चव्हाण विकास प्रशासन प्रबोधिनी, पुणे या संस्थेच्या २०१७-२०१८ या आर्थिक वर्षाच्या अनिवार्य खर्चासाठी संदर्भाधीन क्रमांक १ च्या शासन परिपत्रकान्वये अर्थसंकल्पिय अंदाजामध्ये **रु.४००.०० लाख (अक्षरी रुपये चारशे लाख फक्त)** इतकी तरतूद करण्यात आली असून, संदर्भाधीन क्रमांक ४ च्या शासन परिपत्रकान्वये अर्थसंकल्पिय अंदाजामध्ये केलेल्या तरतूदीच्या अनुषंगाने संपूर्ण अनुदान नियंत्रक अधिकाऱ्यांच्या स्वाधीन करण्यात आले आहे.

त्यापैकी संदर्भाधीन क्रमांक ५ च्या शासन निर्णयान्वये **रु६६.६७ . लाख (रुपये सहासष्ट लाख सदुसष्ट ,हजार फक्त (पहिला हप्ता व** व संदर्भाधीन क्रमांक ७च्या शासन निर्णयान्वये **रु. १७५.०० लाख (अक्षरी रुपये एकशे पंच्याहत्तर लाख फक्त**) दुसरा हप्ता असे एकूण **रु.२४१.६७ लाख (अक्षरी रुपये रु. दोनशे एकेचाळीस लाख, सदुसष्ट हजार फक्त) इतका निधी एप्रिल २०१७ ते डिसेंबर २०१७ या नऊ** महिन्यांकरिता अनिवार्य खर्चासाठी (प्रशिक्षण शुल्क) " ३१ सहायक अनुदान (वेतनेतर) " म्हणून वितरित करण्यात आला आहे.

२. यशवंतराव चव्हाण विकास प्रशासन प्रबोधिनी, पुणे या संस्थेस आता जानेवारी **२०१८ ते मार्च २०१८ या तीन महिन्यांकरिता अनिवार्य खर्चासाठी (प्रशिक्षण शुल्क)** वित्त विभागाच्या संदर्भाधीन क्र. ८ च्या परिपत्रकानुसार एकूण अर्थसंकल्पिय अनुदानाच्या ९०% च्या मर्यादेत, वेतनेतरकरिता **अर्थसंकल्प वितरण प्रणालीवर उपलब्ध असलेल्या शिल्लक सहायक अनुदानामधून रु. ११८.३३ लाख (अक्षरी रुपये एकशे अठरा लाख, तेहत्तीस हजार फक्त**) इतका निधी " ३१ सहायक अनुदान (वेतनेतर) (अंतिम हप्ता) म्हणून मंजूर करण्यात येत आहे.

३. हा खर्च मागणी क्र .ए-४, मुख्य लेखाशिर्ष "२०७० - इतर प्रशासनिक सेवा - ००३ प्रशिक्षण (००) (०६) यशवंतराव चव्हाण विकास प्रशासन प्रबोधिनी, पुणे यास सहाय्यक अनुदान (अनिवार्य) (२०७००५३२) - ३१ सहाय्यक अनुदाने (वेतनेतर)" याखाली सन २०१७-२०१८ या आर्थिक वर्षासाठीच्या मंजूर तरतुदीतून भागविण्यात यावा.

४. सदरहू मंजूर करण्यात आलेले अनुदान संबंधित कोषागारातून काढून घेतल्यानंतर ती काढण्यात आलेली रक्कम महालेखापाल कार्यालयातील लेख्यात त्याच शीर्षाखाली नोंदली गेली आहे किंवा नाही याची खात्री करुन घ्यावी व त्याबाबतचे प्रमाणपत्र १५ दिवसांच्या आत शासनास सादर करावे.

५. संस्थेने आर्थिक वर्ष २०१७-२०१८ मधील मंजूर अनुदानाइतका खर्च सीमित ठेवावा.

६. संस्थेने आता वितरीत करण्यात येत असलेल्या अनुदानाचे विनियोग प्रमाणपत्र (UTILIZATION CERTIFICATE) महालेखापाल, लेखा परीक्षा, महाराष्ट्र-१, मुंबई व शासनाला तातडीने सादर करावे.

७. यशवंतराव चव्हाण विकास प्रशासन प्रबोधिनी, पुणे या संस्थेने उपरोक्त अनुदानामधून केलेल्या खर्चाचे स्वतंत्र लेखे व पुस्तके तपासण्याचे अधिकार महालेखापाल, महाराष्ट्र-१, मुंबई यांना राहतील व त्याकरिता सदर संस्था त्यांना संपूर्ण सुविधा उपलब्ध करुन देईल.

८. यशदा, पुणे या संस्थेचे आहरण व संवितरण अधिकारी (कोड क्र.२२०१०००१२१) यांनी संस्थेस वितरीत करण्यात येत असलेल्या सहायक अनुदानाची रक्कम **रु. ११८.३३ लाख (अक्षरी रुपये एकशे अठरा लाख, तेहत्तीस हजार फक्त** आहरित करावी.

९. यशदा, पुणे या संस्थेने वित्त विभागाच्या संदर्भाधीन क्र.६ येथील शासन परिपत्रकातील परिच्छेद क्र.४ (१) (अ) मध्ये नमूद केल्यानुसार देयक कोषागार अधिकारी यांना सादर करतांना संस्थेचे मागील महिन्यातील बँक अकाऊंट स्टेटमेंट (Bank Account Statement) देयकासोबत जोडण्यात यावे.

१०. सदर शासन निर्णय वित्त विभागाचे परिपत्रक क्र. अर्थसं २०१७/प्र.क्र.७५/अर्थ- ३, दि.१८ एप्रिल, २०१७ अन्वये प्रशासकीय विभागांना प्रदान करण्यात आलेल्या अधिकारान्वये निर्गमित करण्यात येत आहे. सदर परिपत्रकाच्या परिच्छेदातील अनुक्रमांक ९ मध्ये नमूद अटींची पूर्तता होत आहे. त्या परिपत्रकातील परिशिष्टामधील अनुक्रमांक ८ मधील अटी येथे लागू होत नाहीत .

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१८०३२०१५४९१८५६०७ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Vijaykumar Parshuram Soshte

Digitally signed by Vijaykumar Parshuram Soshte
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=General Administration Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=106ede43bb7dcc67e6404aaa146fb4c17a872b3754b63c343b66d6b91dd6b276, cn=Vijaykumar Parshuram Soshte
Date: 2018.03.20 16:17:43 +05'30'

(वि. प. सोष्टे)

कार्यासन अधिकारी , महाराष्ट्र शासन.

प्रति,

१. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता/ लेखा परीक्षा), महाराष्ट्र-१, मुंबई,
२. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता /लेखा परीक्षा), महाराष्ट्र-२, नागपूर,
३. महासंचालक, यशदा, पुणे.
४. लेखाधिकारी, यशदा, पुणे. (२ जादा प्रतींसह).
५. जिल्हा कोषागार अधिकारी, पुणे.
६. उप कोषागार कार्यालय, पुणे.
७. वित्त विभाग (व्यय-४ / अर्थसंकल्प १४), मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
८. कक्ष अधिकारी , सामान्य प्रशासन विभाग/कार्यासन क्र.२५, मुंबई - ३२.
९. मा. अ.मु.स. (सेवा) यांचे वरिष्ठ स्वीय सहायक, सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई - ३२.
१०. निवड नस्ती.